## नियमित दिवाणी दावा क्र. ११/२०१६ मधील निशाणी २२ वरील आदेश

(भाउसाहेब खोत विरुध्द सर्जेराव पवार )

१. वादींनी प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ४७ नियम १ प्रमाणे दाखल केलेला आहे.

२. प्रस्तुत निशाणी २२ चा अर्ज वादी यांनी कोर्टाने वादीने निशाणी १५ प्रमाणे दावा मिळकतीची वस्तुस्थिती मे. कोर्टासमोर रेकॉर्डवर येण्याकरीता दिलेला कोर्ट कमीशनर नेमणुकीबाबतचा अर्ज दि. ११/०९/२०१७ रोजी नामंजूर केला. परंतु या निर्णयावर नाराज होवून खालील कारणास्तव दाखल केलेला आहे.

**कारणे-**

**अ.** सदरचा दावा वादींनी प्रतिवादींविरुध्द प्रतिवादी यांनी दावा ड मिळकतीमध्ये कोणत्याही प्रकारे अतिक्रमण करु नये व दांडगाव्याने बांधकाम करु नये अशी निरंतर ताकीद देवविणेकरीता तसेच वैकल्पीकरित्या प्रतिवादींनी दावा ड मिळकतीमध्ये दरम्यानच्या कालावधीमध्ये अतिक्रमण करुन बांधकाम केलेस सदरचे अतिक्रमीत क्षेत्रातील बांधकाम प्रतिवादींनी स्वखर्चाने काढून घेणेबाबत मॅन्डेटरी ताकीद देवविणे करीता दाखल केला आहे.

वादीच्या दाव्याचे स्वरुप पाहता दावा मिळकतीची वस्तुस्थिती व प्रतिवादींनी दाव्याची नोटीस मिळाल्यानंतर दरम्यानच्या कालावधीमध्ये घाईगडबडीने बेकायदेशीररित्या दावामिळकतीमध्ये अतिक्रमण करुन केलेल्या बांधकामाची मोजमापे व नकाशा मे. न्यायालयासमोर रेकॉर्ड वर दाखल होणे न्यायाच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक होते व आहे. याकरीता वादींनी कोर्ट कमीशनरची नेमणूक करणेबाबत अर्ज दिला होता. सदरचा अर्ज नामंजूर झाल्याने वादींवर अन्याय होणार असून दाव्याच्या कामी गुंतागुंत होणार आहे, सबब दि. ११/०९/२०१७ रोजी निशाणी १५ वरील अर्ज नामंजूर करणेचा केलेला आदेश रद्द होणेस पात्र आहे.

**ब.** दावा मिळकती या मौजे मिरजवाडी, ता. वाळवा, जि. सांगली येथील असून सदर गावी अद्याप सिटी सर्व्हे योजना लागू झाली नसलेने गावठाण मधील

मिळकतींचे पक्के नकाशे उपलब्ध होवू शकत नाहीत. सबब, वर नमूद केलेला निशाणी १५ वरील आदेश रद्द होण्यास पात्र आहे.

**क.** वादींनी दावा दाखल केल्यानंतर प्रतिवादींनी बेकायदेशीररित्या दावा मिळकतीमध्ये अतिक्रमण करुन बेकायदेशीररित्या गोठ्याचे बांधकाम केलेले आहे. तसेच वादीचा दावा हा मॅन्डेटरी ताकीदीकरीता दाखल केलेला असल्याने वाद मिळकतीचे स्वरुप प्रतिवादींनी बेकायदेशीररित्या केलेले बांधकाम तसेच त्याची मोजमापे मे. कोर्टासमोर रेकॉर्डवर येणे न्यायाच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे. तसे झाल्यास मे. न्यायालयास न्यायदानास मदतच होणार असून वादी - प्रतिवादी यांचेतील वाद कायमपणे संपूष्टात येण्यास मदतच होणार आहे. सबब, वर नमूद केलेला निशाणी १५ वरील आदेश रद्द होण्यास पात्र आहे.

**ड.** प्रतिवादींनी आजपावेतो दाव्याचे कामी कैफीयत, म्हणणे अगर निशाणी १५ च्या अर्जास म्हणणेही दिलेले नाही. प्रतिवादी जाणून-बुजून दाव्याचे कामी गैरहजर आहेत. सबब, निशाणी १५ वरील अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे.

३. वादीने सदर अर्जात विनंती केली आहे की निशाणी २२ चा अर्ज मंजूर करण्यात यावा व मे. न्यायालयाने निशाणी १५ चा अर्ज नामंजूर केल्याचा आदेश रद्द करण्यात यावा व सदर कामी निशाणी १५ प्रमाणे कोर्ट कमीशनर यांची नेमणूक करणेचा आदेश करण्यात यावा.

४. प्रस्तुतच्या अर्जास प्रतिवादींनी हजर राहून म्हणणे दिलेले नाही.

५. **दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ४७ नियम १ नुसार,**

> ***1. Application for review of judgment*** *- (1) Any person considering himself aggrieved,-*
>
> (a) *by a decree or order from which an appeal is allowed, but from which no appeal has been preferred,*
>
> (b) *by a decree or order from which no appeal is allowed, or*
>
> (c) *by a decision on a reference from a Court of Small Causes,*
>
> *and who, from the discovery of new and important matter or evidence*

*which, after the exercise of due diligence, was not within his knowledge or could not be produced by him at the time when the decree was passed or order made, or on account of some mistake or error apparent on the face of the record, or for any other sufficient reason, desires to obtain a review of the decree passed or order made against him, may apply for a review of judgment to the Court which passed the decree or made the order.*

६. सदर अर्जाच्या अनुषंगाने खालील मुद्दे विचारार्थ उपस्थित होतात.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | प्रस्तुत निशाणी २२ चा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे काय ? | नाही. |
| २. | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## <u>का र ण मि मां सा</u>

**मुद्दा क्र. १**

७. वादीच्या प्रस्तुत अर्जातील कथनांच्या अनुषंगाने अभिलेखाचे अवलोकन केले. वादीच्या कथनानुसार दावा दाखल केल्यानंतर प्रतिवादीने अतिक्रमण करुन दावा मिळकतीत गोठ्याचे बांधकाम केले. त्याची वस्तुस्थिती व मोजमापे रेकॉर्डवर येण्यासाठी कोर्ट कमीशनरची नेमणूक गरजेची आहे. परंतु जर वादीचे म्हणणे आहे की प्रतिवादीने अतिक्रमण करुन बांधकाम केले तर त्याबाबत वादीने दाव्यात दुरुस्ती केलेली नाही. जी बाबच दाव्यात नमूद नाही त्याबाबत कोर्ट कमीशनर नेमणूक करता येणार नाही. वादीचा दावा निरंतर ताकीदीकरीता व वैकल्पीकरित्या मॅंडेटरी ताकीदीकरीता आहे. त्यात प्रतिवादीने अतिक्रमण केले आहे, ते काढून टाकावे याबाबतीत नमूद नाही किंवा त्या अनुषंगाने दुरुस्तीही नाही. अशा परिस्थितीत कोर्ट कमीशनर नेमणूक करता येणार नाही. सबब, निशाणी १५ वरील आदेशात कोणताही कायदेशीर दोष दिसून येत नाही. याकारणास्तव वादीने दाखल केलेला पुनर्विलोकनाचा अर्ज मंजूर होण्यास कोणतेही सयुक्तीक कारण नाही. त्यामुळे **मुद्दा क्र. १ चे उत्तर मी नकारार्थी** देत आहे.

**मुद्दा क्र. २**

८. मुद्दा क्र. १ मध्ये चर्चा केल्याप्रमाणे व त्यावर निष्कर्ष दिल्याप्रमाणे मुद्दा क्र. २ चे उत्तर खालील आदेश पारित करुन देण्यात येत आहे.

**आ दे श**

अर्ज नामंजूर करण्यात येतो.

सही/---

इस्लामपूर (सौ. एस.व्ही.साळवी)

दि. ०४/०१/२०१८ ७ वे सहदिवाणी न्यायाधीश, इस्लामपूर